# प्रेस नोट ता. ०९/०३/२०१९

**पुणे शहर परिसरातील ४० ते ५० तक्रारदारांचे एटीएम कार्डची क्लोनिंग करुन लाखो रुपयांची फसवणुक करुन अपहार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीला कोंढवा पोलीसांकडुन २४ तासांच्या आत जेरबंद.**

----------------------------------------------------ooooooooooooooooooo----------------------------------------------------

इसम नामे.संबीतकुमार प्रमोद मिश्रा वय.४०वर्षे व्यवसाय.नोकरी रा.अे/१०६ वॉटरगेट सोसायटी,उंड्री ता.हवेली जि.पुणे मुळ रा.अलमपाडा राज्य ओरीसा यांनी मा. अपर पोलीस आयुक्त सो. पुर्व विभाग यांना कळविले की,त्यांचे एटीएम मधुन अज्ञात इसमाने बनावट एटीएम कार्डद्वारे एकाच दिवसांत प्रत्येक १ मिनिटांना १०,०००/- रुपये प्रमाणे व इतर असे एकुण ९२,०००/- रुपये ट्रान्जेशन करुन काढले आहे म्हणुन आदेशान्व्ये तात्काळ दि.०८/०३/२०१९ रोजी कोंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नंबर २१५/२०१९ भादवि कलम ४२० व माहिती तंत्रज्ञान अधि.२००० चे कलम ४३,६६(क)(ड) अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

कोंढवा पोलीस स्टेशनकडील तपास पथकामील पोलीस कर्मचारी पोलीस नाईक जयवंत चव्हाण व अमित साळुंके यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेजची तपासणी करुन त्याचे फुटेजमधील आरोपींची चौकशी दरम्यान माहिती मिळाली की,नमुद गुन्हयातील आरोपी हे सध्या फ्लॅट क्रमांक ८ पार्क मॅजेस्टीक सोसायटी वडाची वाडी रोड,उंड्री पुणे या ठिकाणी राहत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी श्री. अनिल पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक व सहा.पोलीस निरी.चेतन मोरे व तपास पथकातील पोलीस कर्मचारी व महिला स्टाफ यांनी पहाटे अचानक प्राप्त पत्यावर जावुन इसम नामे १)ईरमेहन स्टिवेन २)उम्मु अयान महेबुब जुमा मुळ रा.नाजेरिया यांना पकडुन त्यांचेकडे चौकशी करुन नमुद गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर आरोपींकडुन एटीएम कार्ड क्लोनिंग करण्याकरीता वापलेले इन्स्टुमेंट साहित्य त्यामध्ये अंदाजे ३ लॅपटॉप,२स्कॅनर,१ कॅमेरा,२ पेनड्राईव्ह,इन्स्ट्रमेंट पॅड,१ ग्लु गन,६२ डमी एटीएम कार्ड,२ सी.डी.डिक्स,२ नेट डोंगल,५ मोबाईल हॅण्डसेट व वेगवेगळया १९ बॅंकेचे क्रेडीट कार्ड व डेबीट कार्ड इत्यादी मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे.

नमुद आरोपीपैकी एका आरोपीविरुध्द खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नंबर १७४/२०१७ भादवि कलम ४१९,४२०,माहिती तंत्रज्ञान अधि.२००० चे कलम ४३ (अ)(ब),६६(क)(ड) या गुन्हयात यापुर्वी अटक झालेली आहे.पुणे शहर परिसरात अनेक एटीएम सेंटरमध्ये अशा प्रकारचे कार्ड क्लोनिंग करुन गुन्हे केल्याची माहिती समोर आली असुन आरोपींकडुन आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याने त्यांना नमुद गुन्हयाचे तपासकामी ताब्यात घेतलेले आहे.

अशा प्रकारे नागरीकांची फसवणुक झाली असल्यास त्यांनी पोलीस निरीक्षक,जयराम पायगुडे सायबर पोलीस ठाणे,शिवाजीनगर मुख्यालय पुणे संपर्क क्रमांक ९८२३०१५१०० यांचेशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे कोंढवा,येवलेवाडी,कात्रज,बिबेवाडी,गोकुळनगर,साईनगर उंड्री,पिसोळी या परिसरामध्ये जे नागरीक राहतात व त्यांनी सदर भागातील एटीएम सेंटरचा वापर केलेला आहे त्यांनी खबरदारी म्हणुन आपला एटीएम कार्ड पिनकोड बदलुन घ्यावा.

सदरची कामगिरी श्री.सुनिल फुलारी सो,मा.अपर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर,मा. श्री.प्रकाश गायकवाड सो पोलीस उप आयुक्त परिमंडळ – ५,मा.सुनिल देखमुख सो.सहा पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर,श्री.अनिल पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरी.चेतन मोरे,संतोष शिंदे,पोउपनि.लोखंडे,पोलीस हवालदार राजस शेख,इकबाल शेख,विलास तोगे,विलास ढोले,जयंत चव्हाण,अमित साळुंके,सुशिल धिवार,आदर्श चव्हाण, उमेश शेलारकिरण मोरे,योगेश कुंभार,निलेश वणवे,संजीव कळंबे,पृथ्वीराज पांडुळे,सुरेंद्र कोळगे,उमाकांत स्वामी,अजिम शेख,जगदीश पाटील यांचे पथकाने केलेली आहे.

( अनिल पाटील )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर


पुणे शहर पोलीस आयुक्तालय
कोंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर